लाड कमिटी नियुक्ती आदेश -2024

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभवन' डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१

## सामान्य प्रशासन विभाग

E-mail - smcgados2@gmail.com

जा.क्र/सआस/कक्ष-१/आस्था-२/219 दि. 15/१०/ २०२४. E-८७३८२६

**संदर्भ** :- 1) शासन निर्णय क्रमांक:- सफाई-2018/प्र.क्र.46/सआक, दिनांक 24 फेब्रुवारी, 2023
2) शासन निर्णय क्र.सफाई/2024-प्र.क्र.16/सआक दिनांक 11 मार्च, 2024.
3) शासन निर्णय क्र.सफाई 2023/प्र.क्र.47/सआक दिनांक 07 ऑगस्ट, 2023.
4) क्रमांक न्यायाप्र-2023/प्र.क्र.48/सआस दि.12 जुलै,2024
5) मा.आयुक्त यांची दिनांक 14/10/2024 ची मान्यता.(E-873826).

-: नियुक्ती आदेश :-

उपरोक्त संदर्भ क्र.1 ते 4 संदर्भातील शासन आदेश / निर्देशानुसार मा.आयुक्त यांचे मान्यतेने लाड कमिटी वारसाहक्क अंतर्गत खालील उमेदवारांना त्यांचे नावासमोरील रकान्यात दर्शविलेल्या **पदी नियुक्ती करणेस मान्यता** देण्यात आलेली असून त्यांची रकान्यात दर्शविलेल्या पदी सातवा वेतन आयोगानुसार वेतन स्तर एस-10 र.रु. 29200-92300 नुसार (अधिक इतर मान्य भत्ते) यावर प्रथमत: दिनांक १५ / १० /2024 पासून दोन वर्षाच्या परीविक्षा कालावधीकरीता खालील अटी व शर्तीस अनुसरुन त्यांच्या नावासमोर नमुद कार्यालयाकडे नियुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जात प्रवर्ग | निवड प्रवर्ग | पदनाम | कार्यालय | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | करण तुकाराम पिडगुलकर | अ.जाती | खुला | आरोग्य निरीक्षक | घनकचरा विभाग | S-10- 29200- 92300 |

## अटी व शर्ती

1. उपरोक्त उमेदवारांना सातवा वेतन आयोगानुसार वेतन स्तर एस-10 र.रु. २९२००- ९२३०० या पदास मान्य असलेले इतर मान्य भत्ते यानुसार वेतन मिळेल.
2. सदर सेवकांनी नोकरीत रुजू झालेपासून एक महिन्याच्या कालावधीत मेडिकल बोर्ड, सोलापूर महानगरपालिका,सोलापूर यांचेकडील शारीरिक स्वास्थ प्रमाणपत्र (फिजीकल फिटनेस सर्टिफिकेट) हजर करणे आवश्यक आहे.
3. आपणास महानगरपालिकेची नोकरी सोडणे झाल्यास आपण दोन महिन्याची पुर्व नोटीस देणे आवश्यक आहे किंवा त्याऐवजी दोन महिन्याचा मुळ पगारा इतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे.
4. आपली नेमणूक ही महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेले नियम अथवा यापुढे वेळोवेळी अंमलात येणारे नियम, पोटनियम, विनियम, स्थायी आदेश इत्यादी लागू राहतील.

5. आपली सदरची नेमणूक संपुर्णत: हंगामी स्वरूपाची असल्याने, आपणास केव्हाही कोणतेही कारण न देता विना पुर्व नोटीसी शिवाय नियुक्ती पदावरून कमी करण्यात येईल.

6. आपण नेमणूकीच्या ठिकाणी हजर होताना जर अन्य ठिकाणी नोकरीस असाल तर त्या संस्थेचा / कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा हजर करणे आवश्यक आहे.

7. आपणाकडून नियुक्ती मिळविताना शैक्षणिक पात्रतेसंबंधी व इतर प्रमाणपत्र तसेच अन्य अभिलेखाबाबत महानगरपालिकेची दिशाभूल केली आहे असे यापुढे केव्हाही निदर्शनास आल्यास आपणास तात्काळ नोकरीतून कमी करण्यात येईल. तसेच तोपर्यंत आपणास देण्यात आलेले सर्व आर्थिक व इतर लाभ आपणाकडून वसूल करण्यात येईल तसेच फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल.

8. आपण सदर नेमणूकीचे नियुक्ती आदेश मिळालेपासून सात दिवसाचे आत कामावर रूजू व्हावे, सदरचे नियुक्ती आदेश मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे नियुक्ती प्राधिकारी यांचे समाधान करू शकत नसतील तर आपले नेमणूकीचे आदेश रद्द करणेत येईल.

9. संदर्भ क्र.१ मधील निर्णयास अनुसरुन संबधीत सेवकाने मराठी -30 / इंग्रजी 40 टंकलेखन व शासमान्य MS-CIT अथवा DOEACC संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

10. पोलीस खात्याकडून वर्तणूकीचा दाखला एक महिन्याच्या आत सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

11. पोलीस खात्याकडून देण्यात आलेल्या वर्तणूकीच्या दाखल्यामध्ये भारतीय दंड संहितेनुसार आपल्यावर फौजदारी गुन्हा दाखल असेल तर आपणास शासन सेवेत कायम स्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

12. शासन निर्णयातील तरतूदीनुसार लाड कमिटी वारसाहक्क अंतर्गत आपली नियुक्ती ही वर्ग-3 मध्ये केले असल्याने आपणास लाड कमिटी वारसाहक्क तरतूद लागू राहणार नाही.

**(शीतल तेली – उगले, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**

**प्रत :**

संबंधित उमेदवार

**प्रत :**

१) घनकचरा व्यवस्थापन विभाग    २) मुख्यलेखापाल    ३) अंतर्गत लेखापरीक्षक

४) सेवापुस्तक विभाग - सा.प्र.वि    ५) स्थळप्रत